# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (सचिवालय)

## (नोटीस)

स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २१/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात मागिल विचाराधीन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांकः— १८/०२/२०१९

आदेशान्वये,

हस्ता/—
(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

### मागील विचाराधिन विषय
( दिनांक १४.०२.२०१९)

वि.क्र.725 :— {साप्रवि} म.न.पा. च्या विविध विभागांना संगणक ऑपरेटर्सचा पुरवठा करण्याबाबत.

1. नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांना अंदाजे 150संगणक ऑपरेटर्सची आवश्यकता आहे. कंत्राटदारा मार्फत या ऑपरेटर्सची सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी Minimum Wages Act प्रमाणे न्युनतम दर रू. 24,864/— प्रति माह प्रति संगणक ऑपरेटर याप्रमाणे एका वर्षासाठी रूपये 4,47,55,200/— चा प्राकलनीय खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त खर्चास व निविदा बोलावून हे कार्य करण्यास मंजुरी प्रदान करणे.
2. प्राकलन हे Minimum Wages Act फेब्रुवारी 2015 च्या महाराष्ट्र शासनाच्या ''स्थानिक स्वराज्य संस्था'' चा दराचा आधार घेऊन तयार केलेले आहेत. सबब कंत्राटदारास किमान वेतन देणे आवश्यक राहील. Minimum Wages Act मध्ये शासनाचे दर वाढल्यास किंवा त्यामध्ये बदल झाल्यास त्या अनुषंगाने जी वाढहोईल किंवा बदल होईल, त्याचा फरक (Basic & Special Pay, PF, ESIC etc ) मनपाव्दारे कंत्राटदारास देय राहील. शासनाचे दर ज्या तारखेपासून वाढतील किंवा बदलतील त्या तारखेपासून हा फरक कंत्राटदारास देय राहिल. या बाबीस मंजुरी प्रदान करणे.
3. सध्याच्या कंत्राटाची मुदत दि. 02/03/2019 पर्यंत असल्यामुळे नविन निविदा मंजुर होऊन कार्यादेश होईपर्यंत सध्याच्या कामास सध्याच्या अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मंजुरी प्रदान करणे.
4. मनपाचा नवा आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर व नविन संगणक लिपीक/संगणक ऑपरेटर्स यांची नियुक्ती झाल्यानंतर संगणक ऑपरेटर्सची संख्या त्या प्रमाणात कमी करण्यात येईल. या बाबीस मंजुरी प्रदान करणे.

सबब, उपरोक्त (1), (2), (3) व (4) चे प्रश्न विचारात घेऊन त्यास मंजुरी प्रदान करण्यास सादर प्रस्तुत.

टिपः— 1. हा खर्च पद क्रं. A28900130607 अंतर्गत करण्यात येईल व या पदा अंतर्गत अर्थसंकल्प 2018—2019 मध्ये रू. 700 लक्ष चे प्रावधान उपलब्ध आहे.
2. सविस्तर टिप्पणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## नवीन विषय

वि.क्र.746 :— महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजने
{लोककर्म झोन 10} अंतर्गत प्रभाग क्र. १९ येथील श्री. राजु गौर यांचे घरापासून ते मच्छी मार्केट ते सी.ऐ. रोड पर्यंत सि.सि. पेव्हमेंट रस्ता तयार करणे, बजेरीया येथे श्री. श्रीवास्तव यांचे घराजवळ सिवर लाईन टाकण्याबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रू. ३४,९९,७६८/— असलेल्या निविदा किंमत रू. ३१,२४,७९३/— च्या कामाकरीता प्राप्त दोन निविदापैकी मे. इमरान अंसारी यांची, निविदा किंमती पेक्षा १३.९९% टक्के कमी दराच्या रू. २६,८७,६३४/— च्या प्रथम निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी रू. ३,२२,५१६/— अधिक गुणवत्ता चाचणी रू. २९,०७०/— सह एकुण रू. ३०,३९,२२०/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:—

१) सदर्हु कामास शासन निर्णय क्र. पुरक — २०१८/प्र.क्र.१२३(५१)/नवि. १६ दि. २१ मे २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिपणी जोड नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.747 :— प्रभाग क्र. ६ ब अंतर्गत बाबासाहेब आंबेडकर पार्क ते पॅरिस
{लोककर्म झोन 09} कूडस येथे रस्त्यावर सी.सी. पायवट तयार करण्याच्या बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. २९,५०,९४७/— च्या व निविदा किंमत रु. २६,०८,६७८/— च्या कामाकरिता प्राप्त पॉच निविदांपैकी, मे. आर.बी. यादव यांची, निविदा किंमती पेक्षा ५.८० टक्के कमी दराच्या रू. २४,५७,३७४/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. २७,७६,८३३/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६८१(A२२००१३३०८०२)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.748 :— प्रभाग क्र. 31 हजारेवाडी वकीलपेठ श्री. गायधने यांच्या घरापासुन {स्लम विभाग} पुजा ट्रेडर्स पर्यन्त सिमेंट कॉक्रीट रोड बनविण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 06 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. एन.एन. बेलखुडे यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.46% टक्के कमीवर असलेली रूपये 1,07,77,726/— (रूपये एक करोड, सात लक्ष, सत्यात्तर हजार सात"ो सव्वीस फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

टिप :

1. या कामास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचे दि. 09.10.2018 चे पत्रान्वये प्र"ाासकीय मान्यता प्राप्त आहे. या कामाचा संपूर्ण खर्च शासकीय निधीतुन करण्यात येईल.
2. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.749 :— प्रभाग क्र. ७ ब अंतर्गत बुध्द नगर येथे अजय पाटील यांच्या
{लोककर्म झोन 09} घरापासून ते माता मंदिर पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. ५०,५१,१६१/— च्या व निविदा किंमत रु. ४४,६५,३१२/— च्या कामाकरिता प्राप्त दोन निविदांपैकी, मे. हितेश कन्स्टॅक्शन यांची, निविदा किंमती पेक्षा २.५९ टक्के कमी दराच्या रू. ४३,४९,६६०/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. ४९,१५,११५/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६७९(A४२००१४७०५११)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.750 :— प्रभाग क्र. ०४ ड, गुलशन नगर शिर्के लेआऊट पिवळी नदी
{लोककर्म झोन 08} येथील नाला भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रू. ४९,९९,६४४/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिति यांची दिनांक १९/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४४,५३,३६८/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त २ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. ४०,०८,०३१/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. ४४,५३,३६८/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ४०,०८,०३१/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. १०६००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४८०९६४/— एकुण रू. ४४,९९,५९५/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४९,९९,६४४/— प्राकलनास स्थायी समिति यांचे ठराव क्र ३१८दि. २१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.751 :— प्रभाग क्र. 17 क अतंर्गत गांधीसागर तलाव लगतचा
{उद्यान विभाग} नातिक चौकाच्या दक्षिण- पश्चिम कोपऱ्याचे सौंदर्यकरण करण्याचे विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रूपये 5139900/-रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निवीदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 703(A46001673102) अतंर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१) मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे पत्र क्र. 1176/TR/CSC/Provision दिनांक 03.11.2018 अन्वये विस्तृत प्राकलन तयार करून सादर करण्याचे निर्देश प्राप्त आहे.

२) प्रस्तुत कामाकरीता सन 2018-19 चे आय व्ययकातील पद क्र. 703(A46001673102) अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.

३) प्रस्तुत कामास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

४) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.752 :— प्रभाग क्र. 4 (ब) अंतर्गत कळमना नाका नं. 4 च्या मागे
{लोककर्म झोन 08} पुलियापसुन ते पावनगाव रोड रेल्वे चौकी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदाकार मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची 2.51% कमी दराची रु. 24,49,891/—+ 12% GST(293987/—) + Testing Charges रु. 39350/— असे एकूण 27,83,228/— राशीची निम्नतम निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. या कामाचा खर्च पद क्र. A42001374602 मधून प्रस्तावित आहे.

टिप :—

1. प्रस्तूत कामास स्थायी समिती ठराव क्र. 365 दि. 17/11/2018 नुसार प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.
2. सदर कामाचा खर्च पद क्र. A42001374602 मधुन करण्यात येईल
3. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.753 :— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २५ क, मध्ये घटाटे नगर येथे विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव रू. ४९,२३,२९९/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा. स्थायी समिती यांची दिनांक ०१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४३,६०,३५३/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ४ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचूमल यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.६० टक्के कमी दराची रू. ३८,९८,१५५/— निम्नतम निविदा प्राप्त झाली आहे. या कामची प्रशासकीय मान्यता रू. ४९,२३,२९९/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३८,९८,१५५/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. ३५,४५०/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४,६७,७७८/— एकुण रू. ४४,०१,३८३ /— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४९,२३,२९९/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४२४ दि. ०१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 754 :— {कर विभाग} Door to Door Property survey and GIS updation / Mapping/ Linking and Seamless integration of the same with e-governance software of NMC हे काम मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि. आणि मे. अनंत टेक्नॉलॉजी लिमिटेड, हैद्राबाद या दोन फर्म सर्व्हेचे काम करीत आहे. काम पूर्ण न झाल्यामूळे दिनांक 30 मार्च 2019 पर्यंत मुदतवाढ मिळण्याबाबत प्रश्न विचारात घेणे.

- स्थायी समीती ठराव क्र.१६२ दि.१०/०९/२०१७ अन्वये सदर्हू काम मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड यांना देणेस मंजूरी प्रदान केलेली असून संबंधीतांना कार्यादेश क्र. २११/AD/२०१७ दि.०६/११/२०१७ अन्वये काम देण्यात आलेले आहे.
- मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड ला दिलेल्या कामाचा मुख्य उद्देश असा आहे कि, Property data base सुधारीत करून मालमत्ता कर निर्धारण व वसूली मध्ये Reforms आणणे. हे काम कार्यादेशापासून २२ महिन्यात पूर्ण करावयाचे होते. परंतु दिलेले काम मुदतीपूर्व होवू शकत नसल्यामूळे त्यांना काम पूर्ण करण्यास्तव ठराव क्र. १०४ दिनांक ०७.०७.२०१७ अन्वये ३० डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्याही कालावधीत काम पूर्ण न झाल्यामूळे ठराव क्र. ४९२ दिनांक ०९.०२.२०१८ अन्वये मालमत्तेच्या सर्वेक्षणाचे कामास दिनांक ३१. मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तसेच आणखी असे की, हद्दीतील मालमत्ता कर निर्धारण कक्षेतून सुटलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षणाकरीता ३ महिन्याचा कालावधी एप्रिल २०१८ ते ३० जून २०१८ पर्यंत मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड यांचेकडून दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करू शकत नसल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र. ४९२ दिनांक ०९.०२.२०१८ अन्वये मुद्दा क्र. २ व ३ अन्वये उर्वरीत काम मे. सायबरटेक सिस्टिम ॲन्ड सॉफ्टवेअर प्रा. लि. व मे. अनंत टेक्नॉलॉजी लि. नागपूर. यांना स्थायी समीती ठराव क्र.१८ दि.२३.०३.२०१८ अन्वये सदर्हू काम मे. अनंत टेक्नॉलाजी यांना देणेस मंजूरी प्रदान केलेली असून संबंधीतांना कार्यादेश क्र. ०९/TAD/W.O. दि.२१/०४/२०१८ अन्वये काम देण्यात आलेले आहे.
- दि.३१/६/२०१८ ला उर्वरित मालमत्ते पैकी मे. सायबरटेक सिस्टिम लि. हयाचे कडील कामापैकी निम्या मालमत्ता अंदाजे ७६,००० मे. अनंत टेक्नॉलॉजी लि.सर्व्हे साठी देण्यात आल्या व निम्या

म्हणजेच ७०४६८ मालमत्ता बंद स्थितीत आढळलेल्या/मिळकतदाराने डाटा कलेक्ट करणेस मज्जाव केलेल्या ६१०९२ मिळकतीचा अपूर्ण डाटा पूर्ण करणेचे काम व मालमत्ता कर निर्धारण कक्षेतून सुटलेल्या मिळकतीचा डाटा कलेक्ट करणेचे काम मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड यांना पूर्ण करावयाचे होते..

- ❖ दिनांक ०८.०१.२०१९ पर्यंत एकूण ७३२२६७ Upins असलेला मालमत्ता ७,४३,१७७ युनिटचा सर्वे होवून सर्वे झालेल्या संपूर्ण युनिटचा डाटा मंजुरी करीता Forword केला असून ४९२,७४९ मालमत्तेचा डाटा मंजुर झाला असून ३६७४ मालमत्ता मंजुरी करीता संबंधिताच इनबॉक्स मध्ये उपलब्ध आहे. व ७८९७ मालमत्ता नामंजुर होवून संबंधीत एजेन्सी कडे दुरूस्तीकरीता परत पाठविला आहे. तसेच मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअन लि. यांनी दिनांक ०३.०१.२०१९ च्या पत्रात अंदाजे ३१,३०१ मालमत्तेचा (पेंडींग,शासकीय मालमत्ता, मालमत्ता धारक उपलब्ध नसल्यामुळे) इत्यादी कारणासाठी सर्वे करायचा आहे त्यास अंदाजे १९ मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे पत्रात नमूद आहे. तसेच मे. अनंत टेक्नॉलॉजी लि. यांनी दिनांक २१.१२.२०१८ रोजी पत्र देवून शिल्लक मिळकतीचा डाटा कलेक्ट करणे करीता ३-४ महिने वेळ लागेल असे कळविले आहे. नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारती व जमिनीकरीता मालमत्ता कर निर्धारण होणे गरजेचे असल्यामुळे ३१ मार्च २०१९ पर्यंत संबंधित एजेन्सीला डाटा कलेक्ट करणेच्या कामात मुदतवाढ व दिलेल्या मुदतीत सुध्दा काम पूर्ण न झाल्यास R.F.P. अट क्र. ३.२.१७ प्रति दिवस रू. ७००/- ऐवजी ठराव क्र. १७८ अन्वये म.न.पा. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे प्रति दिवस रू. १०,०००/- दंड आकारणे. परंतू तात्कालीन मा. आयुक्तांचे निर्देशान्वये ठराव क्र. १७८ दिनांक ३०.१२.२०१७ तील निर्णयान्वये मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर लि. कडून प्रति दिवस रू. १०,०००/- दंड आकारणे व Rework करून घेण्यात येत असलेल्या मालमत्ता करीता अर्धा दराने भुगतान करणेबाबत अंमलबजावणी करणेकरीता कायदयाचे सल्लागाराचे अभिमत घेण्यात आले. कायद्याचे सल्लगाराचे अभिमता प्रमाणे R.F.P. दस्ताऐवजातील Clause मधील बदल म.न. पा. एकतर्फी करून शकणार नाही. दोन्ही पक्षांनी आपल्या संमतीने निर्णय घेणे गरजेचे असल्याचे सल्ला दिलेला आहे.
- ❖ नागपूर महानगरपालिका सिमेतील संपूर्ण इमारत व जमिनी करीता जी.आय.एस. माहिती गोळा करूनच मालमत्ता कर निर्धारण करणे अपेक्षीत असल्याने तसेच नागपूर महानगरपालिका एकूण गाळा करणाऱ्या इतर विभागांकरीता सुद्धा आवश्यक माहिती जी.आय.एस. सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करून घेणे अपेक्षीत असल्याने शिल्लक असलेले काम पूर्ण करणेकरीता संबंधित एजेन्सींना सदरहू कामाकरीता मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत सर्वेच्या कामास मुदत वाढ व हया कालावधीत काम पूर्ण न झाल्यास तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणे बाबत प्रश्न विचारात घेणे.

वि.क्र. 755 :— {लोककर्म झोन 02}

प्रभाग क्र. १४—अ येथील गिट्टीखदान येथे श्री. सुरेश गायधने ते मनिष फेब्रिकेशन पर्यंत सी. सी. पेव्हमेंट रस्ता तयार करण्याच्या रु. ३३,४५,३८२/— च्या कामाकरीता दुसऱ्या वेळेस प्राप्त तीन निविदांपैकी मे. आर. बी. केवळरामानी यांची प्राकलनीय दरांपेक्षा रु. ४% प्रतिशतने कमी दरांची रु. ३२,११,५६७/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

कामाचा खर्च पद क्रमांक A42001470511 अंतर्गत करण्यात येईल.

वि.क्र.756 :–
{लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. ०४ ड, भवानी नगर येथे पिवळया नदीला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.२५ टक्के कमी दराची रू. ६३,४५,१८६/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न वियारात घेणे. या कामाचा खर्च पद क्र. ए ४२००१३७४६०२ अंतर्गत प्रस्तावित आहे.

टिप :–

१) सदर्हू कामाचे रू. ६३,४५,१८६/– प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३६८ दि. १७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 757 :–
{लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. २५ ड, अंतर्गत गंगाबाग पारडी येथे विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव रू. ४८,७३,१०९/–, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा. स्थायी समिती यांची दिनांक ०१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४३,१५,५४०/– च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ४ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचूमल यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.७३ टक्के कमी दराची रू. ३८,५२,४८२/– निम्नतम निविदा प्राप्त झाली आहे. या कामची प्रशासकीय मान्यता रू. ४३,१५,५४०/– असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३८,५२,४८२/– + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. ३५,४५०/– + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४,६२,२९८/– एकुण रू. ४३,५२,२३० /– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१) सदर्हू कामाचे रू. ४८,७३,१०९/– प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४२७ दि. ०१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.758 :–
{लोककर्म झोन 09}

प्रभाग क्र. ३ क अंतर्गत संगमनगर येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. ४९,९५,३३१/– च्या व निविदा किंमत रु. ४४,६०,११७/– च्या कामाकरिता प्राप्त सात निविदांपैकी, मे. हितेश कन्स्टॅक्शन यांची, निविदा किंमती पेक्षा १०.२५ टक्के कमी दराच्या रू. ४०,०२,९५४/– च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी इत्यादी सह एकूण रु. ४४,८३,३०८/– च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१) या कामाचा खर्च पद क्र.६१८(A४३९०१३७०८१२)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.759 :–
{लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. 23 (ब) अंतर्गत शास्त्रीनगर येथे श्री प्रधान, श्री चवरे व श्री देवीकर यांचे घरामागे तूटलेल्या नाला भिंतीचे बांधकाम करणे या कामाकरीता प्राप्त निविदाकार मे. गीती कंन्स्ट्रक्शन यांची 1.00% कमी दराची रु. 2472240/– + 12% GST(296668/–) + Testing Charges रु. 7000/– असे एकूण 27,75,908/– राशीची निम्नतम निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. या कामाचा खर्च पद क्र. A43901370812 मधून प्रस्तावित आहे.

टिप :–

1. प्रस्तूत कामास स्थायी समिती ठराव क्र. 566 दि. 14/01/2019 नुसार प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.
2. सदर कामाचा खर्च पद क्र. A43901370812 मधुन करण्यात येईल
3. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 760 :– {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ३४ क, शेष नगर येथे नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामाच्या निवीदा मागविल्या असता एकून चार पात्र निवीदा प्राप्त झाल्या यापैकी श्री राजेश रंगारी यांची निम्नतम दराची निवीदा असून, प्राकलनीय राशीपेक्षा १७.१७ टक्के कमी दराची, रु. ३६,६२,६३८.००/– एवढया रक्कमेची प्राप्त झाली आहे.

श्री राजेश रंगारी यांची प्राकलनीय दरापेक्षा १७.१७ टक्के कमी दराची रु. ३६,६२,६३८/– + टेस्टींग चार्ज रु. १४,२००/– व या एकूण रक्कमेवर १२.०० टक्के G.S.T. रु. ४,४१,२२१/– सह एकूण रु. ४१,१८,०५९/– रक्कमेची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१. मा. अध्यक्ष स्थायी समिती, यांचे ठराव क्र ३९० दि. ०१/१२/२०१८ नुसार मंजूरी प्राप्त आहे.

२. सदर कामास तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. (T. S. No. SE / PWD / 96 / 18 -19, Dt. 15. 9. 2018. ).

३. प्रस्तुत कामाकरीता सन २०१८–२०१९ चे आय–व्ययकातील पद क्र. A४२००१३७४६१२ (ना. सु. प्र. तर्फे हस्तांतरीत ५७२ व १९०० अभिन्यासातील कामे) अंतर्गत खर्च प्रस्तवित आहे.

४. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 761 :– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २५ ड, भरतवाडा रोड ते शुभलक्ष्मी इंटरप्राईजेंस, राम मंदीर, भवानी मंदीर येथील रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव रू. ३९,९०,८२४/–, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा. स्थायी समिती यांची दिनांक ०१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ३४,४८,८५०/– च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ३ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. ३१,०३,९६१/– निम्नतम निविदा प्राप्त झाली आहे. या कामची प्रशासकीय मान्यता रू. ३९,९०,८२४/– असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३१,०३,९६१/– + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २५,१००/– + १२ टक्के जी. एस. टी. रू. ३,७२,४७५/– एकुण रू. ३५,०१,५३६ /– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१) सदर्हू कामाचे रू. ३९,९०,८२४/– प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४२६ दि. ०१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.762 :– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २४ अ, अंतर्गत पाचझोपडा जानकी नगर येथे सिताबाई गायकवाड, नारायण उमरेडकर आणि गल्ली नं. १५ येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रू. ४०,५९,५२८/– रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १९/१०/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ३४,२८,६८०/– च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ४ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. व्हि. एफ. दढारे यांची प्राकलनीय दरापेक्षा ६.७१ टक्के कमी दराची रू. ३१,९८,६१५/– प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. ३४,२८,६८०/ – असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३१,९८,६१५/– + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २३३००/– + १२ टक्के जी. एस. टी. रू. ३८३८३३/– एकुण रू. ३६,०५,७४८/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१) सदर्हू कामाचे रू. ४०,५९,५२८/– प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३२७ दि. १९/१०/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 763 :— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २५ क, अंतर्गत शिवनगर पूनापूर येथील विविध रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव रू. ४९,८२,८८६/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा. स्थायी समिती यांची दिनांक ०१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४४,१७,००६/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ३ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. ३९,७५,३००/— निम्नतम निविदा प्राप्त झाली आहे. या कामची प्रशासकीय मान्यता रू. ४९,८२,८८६/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३९,७५,३००/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. ३२,०००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४,७७,०३६/— एकुण रू. ४४,८४,३३६ /— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४९,८२,८८६/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४२५ दि. ०१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.764 :— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. ०४ क, मधिल भरतवाडा गावातील, भरतवाडा घाटाचा विकास करण्यास्तव रू. २९,६८,२२३/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १४/०१/२०१९ ला मंजूरी प्राप्त असून रू. २६,२७,३०८/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त २ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. पी. पी. धनविजय यांची प्राकलनीय दरापेक्षा ३.७० टक्के कमी दराची रू. २५,३०,०९७/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. २६,२७,३०८/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. २५,३०,०९७/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २२,९००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ३०३६१२/— एकुण रू. २५,३०,०९७/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. २९,६८,२२३/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ५७६दि. १४/०१/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.765 :— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २४ अ, अंतर्गत पाच झोपडा मिनीमाता नगर येथे श्री. बंजारे, श्री. तोशी, डॉ. तुलसी जोशी यांचे घराजवळ सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रू. ३७,७४,४९०/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक २१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. २९,३१,१५०/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त २ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. समरेश प्रसाद चौव्हाण यांची प्राकलनीय दरापेक्षा १.०० टक्के कमी दराची रू. २१,०१,८३८/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. २९,३१,१५०/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. २१,०१,८३८/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २३,३००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ३,४८,२२१/— एकुण रू. ३२,७३,३५९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ३७,७४,४९०/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४५०दि. २१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.766 :— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र.२९ ड, मौजा हुडकेश्वर या भागातील राजापेठ ते पिपळा रोड पर्यंत भुमीगत नाली टाकण्याच्या कामाच्या निविदा मागविल्या असता एकूण तीन पात्र निवीदा प्राप्त झाल्या. यापैकी श्री. विनोद मोहन मडावी

यांची निम्नतम दराची निवीदा असून, प्राकलनीय राशीपेक्षा १.६६ टक्के कमी दराची, रू. ५३,०६,१९९.०० एवढया रक्कमेची प्राप्त झाली आहे.

श्री. विनोद मोहन मडावी यांची प्राकलनीय दरापेक्षा १.६६ टक्के कमी दराची रू. ५३,०६,१९९/— + टेस्टींग चार्ज रू. १०,३००/— व या एकूण रकमेवर १२.०० टक्के GST रू. ६,३७,९८०/— सह एकूण रू. ५९,५४,४७९/— रकमेची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर कामास प. क्र. डेस्क १२/एमयुएन ३/ कावि— ६२८/प्रमा—८०/२०१८ जिल्हाधिकारी कार्यालय, दि.१४/०५/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) सदर कामास तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. ( T. S. No. 87/Chif Engr. /2018-19, Dt. २.०४. २०१८).

३) या कामाचा खर्च महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियंता अंतर्गत ५० टक्के शासनाचा हिस्सा, व ५० टक्के म न पा चा हिस्सा आहे.

४) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.767 :— {लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. ०४ क, अंतर्गत न्यु ओमसाई नगर येथे नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रू. ४८,३४,९७५/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १७/११/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४३,०५,१४२/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ६ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. व्हि. एफ. दढारे यांची प्राकलनीय दरापेक्षा ११.५३ टक्के कमी दराची रू. ३८,०८,७५९/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. ४३,०५,१४२/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३८,०८,७५९/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. ११८००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४५७०५१/— एकुण रू. ४२,७७,६१०/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४८,३४,९७५/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३६४ दि. १७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.768 :— {लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. २४ क, अंतर्गत चिखली देवस्थान येथे रामदास चौधरी आधि गायधने यांचे घराजवळ सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रू. ३०,६२,८६०/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक २१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. २५,८१,१७०/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ३ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. पी. पी. धनविजय यांची प्राकलनीय दरापेक्षा ३.७७ टक्के कमी दराची रू. २४,८३,८६०/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. २५,८१,१७०/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. २४,८३,८६०/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २३३००/— + यूटीलीटी चार्चेस १३०२२३/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. २९८०६३/— एकुण रू. २९,३५,४४६/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ३०,६२,८६०/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ४७४ दि. २१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.769 :— प्रभाग क्र. ०४ क, अंतर्गत खसरा क्र. ८७/१ बिनाकी गृ.
{लोककर्म झोन 08} नि. स. संस्था येथे डांबरीकरण आणि पेव्हींग ब्लॉकची कामे करण्यास्तव रू. ४९,०३,४५५/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १७/११/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४२,२९,५१७/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त २ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा ५.११ टक्के कमी दराची रू. ४१,०८,२७९/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. ४२,२९,५१७/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ४१,०८,२७९/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २५,५००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४,९२,९९३/— एकुण रू. ४१,०८,२७९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४९,०३,४५५/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३५८ दि. १७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.770 :— प्रभाग क्र. ०४ ब, अंतर्गत वांजरा गावामध्ये भुमिगत पाईप
{लोककर्म झोन 08} लाईन व सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रू. ५७,७०,४२७/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १७/११/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४८,८२,०२६/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ४ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. व्हि. एफ. दढारे यांची प्राकलनीय दरापेक्षा ७.५१ टक्के कमी दराची रू. ४५,१५,३८५/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता ४८,८२,०२६/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ४५,१५,३८५/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. २४८००/— + युटीलीटी चार्चेस २४५३४१/—+ १२ टक्के जी. एस. टी. रू. ५४१८४६/— एकुण रू. ५३,२७,३७२/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ५७,७०,४२७/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३५९ दि. १७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.771 :— प्रभाग क्र. ७ क अंतर्गत लघुवेतन कॉलोनी येथे बेलेलकर
{लोककर्म झोन 09} यांचे घरापासुन मे हमने यांचे घरापर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. २९,६८,४११/— च्या व निविदा किंमत रु. २३,९६,५८७/— च्या कामाकरिता प्राप्त चार निविदांपैकी, मे. अमित कन्स्टॅक्शन यांची, निविदा किंमती पेक्षा ५.०० टक्के कमी दराच्या रू. २२,७६,७३३/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. २५,५३,५४१/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६७९(A४२००१४७०५११)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.772 :— महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजने
{लोककर्म झोन 10} अंतर्गत प्रभाग क्र. १४ येथील जुना फुटाळा सुलभ शौचालय मागील संरक्षण भिंत बनविणे, गजानन महाराज मंदिराला लागून नाल्याची भिंत बनविण्याच्या कामाची प्राकलनीय रक्कम रू. ३९,९९,२६८/— असलेल्या निविदा किंमत रू. ३५,७०,७७४/— च्या कामाकरीता प्राप्त दोन निविदापैकी मे. जानवी इंटरप्राईजेस यांची, निविदा किंमती पेक्षा १४%

टक्के कमी दराच्या रू. ३०,७०,८६६/— च्या प्रथम निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी रू. ३,६८,५०४/— अधिक गुणवत्ता चाचणी रू. २९,०७०/— सह एकुण रू. ३४,६८,४४०/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिपः—
१) सदर्हु कामास शासन निर्णय क्र. पुरक — २०१८/प्र.क्र.१२३(५१)/नवि.१६ दि. २१ मे २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
२) सविस्तर टिपणी जोड नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.773 :— {लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. ०४ ब, अंतर्गत कळमना गाव येथील कळमना घाटाला लागून असलेल्या नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रू. ३७,०६,०१२/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक १७/११/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ३२,९८,३३९/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ६ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. व्हि. एफ. दढारे यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.९२ टक्के कमी दराची रू. २९,३८,१६०/— प्राप्त झाली आहे. याकामची प्रशासकीय मान्यता रू. ३२,९८,३३९/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. २९,३८,१६०/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. १०६००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ३५२५७९/— एकुण रू. ३३,०१,३३९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप :—
१) सदर्हू कामाचे रू. ३७,०६,०१२/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र ३६७ दि. १७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.774 :— {समाजकल्याण विभाग}

नागपूर महानगरपालिकामार्फत दिनांक ०६.०१.२०१९ ते १२.०१.२०१९ या कालावधीत आयोजित महिला उद्योजिका मेळावा करिता मागविण्यात आलेल्या निविदा अनुषंगाने निविदाकार मे. शोबिज इटरटेन्मेट यांना निम्नतम दराची १८ % प्राकलन दरापेक्षा कमी दराची रूपये ५१,६०,९७४/— मात्र वाटाघाटी दरम्यान त्यांनी रूपये ४४,००,७८६/— या दरावर कार्यकरण्याची तयारी दर्शविली असल्याने संस्थेचे आर्थिक हित लक्षात घेता मे. शाबिज इटरटेन्मेट यांना रूपये ४४,००,७८६/— + १८% GST रु. ७,९२,१४१/— = रु. ५१,९२,९२७/— राशीवर काम करण्यास कार्यादेश देण्यास्तव प्रश्न विचारात घेण्याबाबत.
टिप :— सविस्तर माहिती नस्तीत संलग्न.

वि.क्र.775 :— {नगररचना विभाग}

नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीच्या दिनांक 09.11.2018 रोजी भरलेल्या सभेत खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.क्रमांक

“ ज्याअर्थी नागपूर महानगरपालिका क्षेत्रात दोन प्राधिकरणीकडे इमारत मंजूरीचे अधिकार आहे. त्याअर्थी नागपूर सुधार प्रन्यास यांनी रू. 1 कोटी पेक्षा जास्त भुगतानाचे देयक निघत असलेल्या भुखंडधारकांना टप्पा टप्पाने देयके भरण्याची सुविधा ठरावा द्वारे देण्यात आली आहे. म्हणून महानगरपालिकेच्या इमारत नियंत्रण क्षेत्रात सुध्दा अशी पध्दत अंमलात आणायला पाहिजे असे आमचे मत आहे. एकंदरीत इमारत बांधकाम रेखाचित्र मंजूर करतांना आकारण्यात येणारे शुल्क अनेक जमिन मालक व विकासकांना एकमुस्त भरणे शक्य होत नाही. आर्थिक मंदीमुळे बांधकाम क्षेत्रामध्ये जी प्रगती व्हावयास पाहिजे ती होत नसुन त्यामुळे या व्यवसायावर मंदी निर्माण झालेले आहे. याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्रोतावर झालेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे व नागपूर

क्षेत्रातील जमिन मालक व विकासक यांना सुध्दा शुल्क भरतांना सोईचे व्हावे या दृष्टीकोनातून टप्पा टप्प्याने शुल्क भरावयाचा नागपूर सुधार प्रन्यासने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे महानगरपालिकेने सुध्दा असा निर्णय घ्यावा असे आमचे मत आहे.

करीता महानगरपालिकेच्या क्षेत्रात विकास व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीकोनातून सर्व समावेशक निर्णय या स्थायी समितीने घेवून रू. 1 कोटी पेक्षा अधिक शुल्क येणारे जमिन मालक व विकासकांना टप्पा टप्प्याने शुल्क घेवून बांधकाम परवानगी देण्यास या धोरणास स्थायी समितीने मंजूरी प्रदान करून उपरोक्त बाब धोरणात्मक निर्णयाकरीता महानगरपालिकेच्या सभागृहाकडे मंजूरी करीता पाठवावी ही विनंती. तसेच आणखी असे की, उपरोक्त धोरणात्मक निर्णय म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यापूर्वी विभागाने ना.सु.प्र. ने मंजूर केलेल्या ठरावाचा अभ्यास करून व विभागाच्या सुचना अंतर्भुत करून पाठवाव्या."

यावर नागपूर महानगरपालिका प्रशासनाने खालीलप्रमाणे ठरविले आहे.

1. " नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रात कोणत्याही जमिनीचा वा इमारतीचा वापर सुरू करण्यावर वा तिच्या वापरात बदल करण्यावर किंवा या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 अन्वये ज्यासाठी परवानगी आवश्यक आहे अशा कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा विकास करण्यावर उक्त अधिनियमाचे कलम–124 अ मधील तरतूदीनूसार विनिर्दीष्ठ केलेल्या दरांनी विकास आकार बसविणे आवश्यक आहे.
2. जमिनीच्या वर्गीकरणानूसार उक्त अधिनियमाचे कलम–124 ब मध्ये विकास आकाराचे दर आणि तो बसविण्याची कार्यपध्दती नमूद आहे.
3. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम 2010 नूसार अधिनिमयाच्या दुसऱ्या अनुसूचिच्या स्तंभ–4 मध्ये विनिर्दीष्ठ केलेल्या दरांनी विकास आकार बसवील व त्याची वसुली करील असे कलम–124 ब (2) मध्ये नमूद आहे.
4. विकास आकार परिगणीत करून विकासकास मागणीपत्र दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या कालावधीत उक्त रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उक्त कालावधीत रक्कमेचा भरणा न केल्यास 18% दराने व्याजाची आकारणी करणेची तरतूद अधिनियमाच्या कलम 124 इ (3) मध्ये नमूद आहे.
5. निवासी वापराकरीता बांधकाम क्षेत्राच्या बाजारमुल्य दराच्या 2% प्रमाणे तर वाणिज्य वापराकरीता 4% दराने विकास आकाराची परिगणना करण्यात येते.
6. वरील सर्व बाबी पाहता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतूदीत टप्प्या टप्प्याने विकास आकार वसुल करणेची तरतूद नाही.
7. बांधकाम परवानगी देतांना विकास आकार व्यतिरीक्त खालील बाबींकरीता शुल्काची आकारणी करण्यात येते.

   (i) इमारत पंजीयन शुल्क – रू. 5 /- प्रती चौ.मी. प्रमाणे

   (ii) अनामत रक्कम – प्राकलनीय राशीच्या 1% वा कमाल रू. 75,000/-

   (iii) बिल्डींग मटेरीयल स्टॅकींग चार्जेस – प्राकलनीय राशीच्या 1/2 % वा कमाल रू. 50,000/-

(iv) जिना/पॅसेज/लिफ्ट चे 30: मर्यादेत बांधकाम क्षेत्र – बांधकाम क्षेत्रावर जमिनी दराचे 10% प्रमाणे निवासी करीता 20% प्रमाणे वाणिज्य करीता.

(v) बंदीस्त बाल्कनी क्षेत्र – बांधकाम क्षेत्रावर जमिन दराचे 20% प्रमाणे

(vi) सिव्हर लाईन कनेक्शन – बांधकाम क्षेत्राच्या रू. 2.50 /- प्रती चौ.मी.

(vii) हेरीटेज संवर्धन – विकास आकाराच्या 2% प्रमाणे

(viii) कामगार कल्याण उपकर – प्राकलनीय राशीच्या 1% दराने सदर रक्कम–कामगार कल्याण विभागाच्या लेखाशिर्षातंर्गत जमा करणे अनिवार्य आहे.

(ix) 30% अधिमुल्य आकारून अतिरीक्त चटईक्षेत्र निर्देशांक – शासनाने निर्धारीत केलेल्या प्रिमियम दरानूसार आलेल्या एकुण रक्कमेपैकी 50% रक्कम म.न.पा. व 50% रक्कम शासनाकडे जमा करणे अनिवार्य आहे.

(x) TOD (Transit Oriented Development) अंतर्गत अतिरीक्त चटईक्षेत्र निर्देशांक – शासनाने निर्धारीत केलेल्या प्रिमियम दरानूसार आलेल्या एकुण रक्कमेपैकी 50% रक्कम म.न.पा. व 50% रक्कम मेट्रोकडे (NMRCL) जमा करणे अनिवार्य आहे.

वरील बाबी पाहता विकास परवानगी देतांना शासन, कामगार कल्याण विभाग व NMRCL कडे रक्कमा जमा करणे अनिवार्य आहे. तेव्हा विकास आकाराच्या रक्कमा टप्प्या टप्प्याने परिगणीत करून मागणीपत्र देणे उचित होणार नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा सर्वकष विचार करता व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम–124 नूसार विकास आकार परिगणीत करून वसुल करणेच्या कार्यपध्दतीत उपरोक्त रक्कमा टप्प्या टप्प्याने विकासकाकडून वसुल करणेचे प्रावधान नसल्याने अशी कार्यवाही म.न.पा. मध्ये अवलंबविणे योग्य होणार नाही.”

मा. स्थायी समितीने दि. 09.10.2018 रोजीच्या ठराव क्र. 313 अन्व्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेत सादर करणे अधिनियमाच्या तरतूदीनूसार योग्य होणार नाही. तसेच याबाबत इतर नियोजन प्राधिकरणाकडे चौकशी केली असता अशाप्रमाणे विकास आकार टप्प्या टप्प्याने आकारणीबाबतची कार्यपध्दती नसल्याचे कळले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानूसार सदर विषय मा. महासभेपूढे प्रस्तावित करणे योग्य होणार नाही.

तेंव्हा स्थायी समितीच्या दिनांक 09.10.2018 रोजीच्या सभेतील ठराव क्र. 313 वर प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाची नोंद घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

वि.क्र.776 :–
{लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. २५ क, मध्ये श्यामनगर आणि नवीन नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव रू. ४९,२४,७१०/—, रूपयाचे प्रस्तावास म. न. पा स्थायी समिती यांची दिनांक ०१/१२/२०१८ ला मंजूरी प्राप्त असून रू. ४३,६५,०६३/— च्या निविदा मागविल्या असता प्राप्त ४ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू.३९,२८,५१२/— रक्कमेची निम्नतम निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता

रू. ४९,२४,७१०/ — असुन या कामावर निविदाकाराचा देकार रू. ३९,२८,५१२/— + लेबॉरटरी टेस्टींग चार्चेस रू. ३२,०००/— + १२ टक्के जी. एस. टी. रू. ४,७१,४२१/— एकुण रू. ४४,३१,९३३/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर्हू कामाचे रू. ४९,२४,७१०/— प्राकलनास स्थायी समिती यांचे ठराव क्र. ४२८ दि. ०१.१२. २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 777 :—
{शहर अभियंता}

शासनाकडून महानगरपालिकेस सर्वसाधारण रस्ता अनुदाना अंतर्गत सन २०१६—१७ साठी प्राप्त रू. १.५० कोटी मधून खामला रोड — सावरकर नगर चौक ते सहकार नगर नाल्यापर्यंतच्या मार्गाच्या डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त चार निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरापेक्षा १३.३९ टक्के कमी दराची रू. १,१६,१२,१५७ रकमेची निविदा स्विकृत करणे तसेच बांधकाम साहित्य तपासणी शुल्क रू. ३१३०० + १२ टक्के जीएसटी रू. १३,९३,४५९/— असे एकूण रू. १,३०,३६,९१६/—रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. शासन निर्णय क्र. सरस्ता—२०१८/प्र.क्र.१५/नवि—१६ दिनांक २५.१.२०१८ अन्वये प्राप्त रू. १.५० कोटी मधून सर्वसाधारण रस्ता अनुदानातंर्गत काम प्रस्तावित आहे.
2. म.न.पा. विशेष सभा ठराव क्र. ३२४ दिनांक २९.०१.२०१९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.
3. प्रस्तुत कामाचा खर्च पद क्र. ६४९ ( ए—४, २००१३६१००२) अंतर्गत करण्यात येईल.
4. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 778 :—
{शहर अभियंता}

शासनाकडून महानगरपालिकेस सर्वसाधारण रस्ता अनुदाना अंतर्गत सन २०१७—१८ साठी प्राप्त रू. १.५० कोटी मधून ग्रेट नाग रोड वरील धंतोली आर.ओ.बी. ते बैद्यनाथ चौकापर्यंतच्या उजव्या बाजुच्या मार्गाचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त दोन निविदांपैकी मे. मुकेश कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १३.११ टक्के कमी रू. १,१६,४०,१५० रकमेची निविदा स्विकृत करणे तसेच बांधकाम साहित्य तपासणी शुल्क रू. ३१३०० + १२ टक्के जीएसटी रू.१३,९६,८१८/— असे एकूण रू.१,३०,६८,२६८/—रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१. शासन निर्णय क्र. सरस्ता—२०१७/प्र.क्र.४०/नवि—१६ दिनांक २८.०२.२०१७ अन्वये रू. १.५० कोटी सर्वसाधारण रस्ता अनुदानातंर्गत काम प्रस्तावित आहे.
२. म.न.पा. विशेष सभा ठराव क्र. ३२३ दिनांक २९.०१.२०१९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.
३. प्रस्तुत कामाचा खर्च पद क्र. ६४९ ( ए—४, २००१३६१००२) अंतर्गत करण्यात येईल.
४. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 779 :—
{लोककर्म झोन 01}

प्रभाग क्रं. ३७ ब, अंतर्गत गजानन नगर परीसरातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण ५ निविदापैकी मे. श्री. आर. एम. दयारमानी, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. २३,६७,६३७/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) रु. २६,५१,४०७/— रकमेचे प्राकलनास अधि. अभि. (लोककर्म) यांनी तांत्रीक मान्यता दिली आहे.

२) मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी त्यांचे पत्र क्र. 689/PR/CSC/Provision दि. ०१.०९.२०१८ नुसार या कामास रु. २९,९६,१००/— रकमेचे प्रावधान पद क्र. A ४२००१३७४६१२ मधुन उपलब्ध करुन दिलेले आहे.

३) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.780 :— प्रभाग क्र. २ क येथील कबीरनगर येथे सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते
{लोककर्म झोन 09} तयार करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. ४९,८६,४३९/— च्या व निविदा किंमत रु. ४४,०८,०९६/— च्या कामाकरिता प्राप्त सहा निविदांपैकी, मे. अमित कन्स्टॅक्शन व यांची, निविदा किंमती पेक्षा ५.०१ टक्के कमी दराच्या रू. ४१,८७,२५१/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. ४७,३१,५९४/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६८१(A२२००१३३०८०२)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 781 :— मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांना पार्ट A च्या
{कर विभाग} कामाकरीता 2 वर्षाचा Support Period च्या कामास मुदतवाढ देण्याबाबत, 29 फेब्रुवारी, 2018 ते 28 फेब्रुवारी 2020 पर्यंत.

नागपूर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. 162 दिनांक 10.09.2015 अन्वये मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांना नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारत व जमिनीकरीता मालमत्ता निर्धारणाकरीता व नागपूर महानगरपालिकेकरीता महसूल गोळा होत असलेल्या इतर विभागाकरीता आवश्यक डाटा कलेक्ट करण्याचे काम कार्यादेश क्र. 211/ए.डी. दिनांक 06.11.2015 अन्वये देण्यात आलेले आहे.

मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांना कर व कर आकारणीचे हे काम पार्ट A व पार्ट B या दोन भागात देण्यात आलेले आहे.

पार्ट A :— यामध्ये Design and implementation of Assessment and Conslolidation of Municipal Revenues application (including all interfaces & integration) व

पार्ट B :— यामध्ये GIS based Door to Door Survey Work यापैकी पार्ट A चा कार्यकाळ माहे फेब्रुवारी 2018 मध्ये संपूष्टात आलेला असून कर विभागाने सर्वेचे कामास (पार्ट B) वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. व पार्ट B चा डेटा updation चे काम सूरू आहे.

पार्ट A चा Support Period फेब्रुवारी 2018 ला संपूष्टात आलेला आहे.

पार्ट B चे काम पूर्ण करण्याकरीता पार्ट A च्या Support च्या कामाची गरज भासणार असल्याने पूढील कार्यवाही E-Governance विभागातर्फे करण्यात यावी असे विभागाने प्रस्तावित केले होते. दिनांक 28.02.2018 मध्ये Support Period संपूष्टात आल्यामुळे कर व कर आकारणी विभागाने मा. आयुक्तांच्या निर्देशानुसार मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांच्याकडून पार्ट A चे Support चे काम सूरू ठेवले आहे.सदर्हु कामाकरिता व कालावधी मा.स्थायी समिती ची कार्योक्त्वर मंजूरी घेणे गरजेचे आहे.पुढील एक वर्षाच्या कामाकरिता फेरप्रस्ताव सादर.

ई—गव्हर्नन्स विभागाने कळविले की, ई—गव्हर्नन्स विभागाकडे तथा पुरेसे तसेच तांत्रिकदृष्टया सक्षम मनुष्यबळ नाही. त्यामुळे मे. सायबरटेक कडून ई—गव्हर्नन्स विभाग सरळ taking over handing over ची प्रक्रिया करू शकत नाही. Taking over ची प्रक्रीया करण्यासाठी नविन एजेन्सी नेमावयाची झाल्यास नविन ऐजन्सी नेमणे व Knowledge Transfer करणे यात किमान सहा महिन्याचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. तसेच त्यात बऱ्याच अडचणी येण्याची शक्यता आहे. हा विषय Property Tax collection शी संबंधित असल्यामूळे अत्यंत महत्वपूर्ण आहे. याचा परिणाम कर वसुलीवर सुध्दा होऊ शकतो. मे. सायबरटेक सिस्टम ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांनी सर्वेच्या कामाकरीता पार्ट 'A' अंतर्गत केलेल्या कामाकरीता सपोर्ट ची गरज पूढे भासणार आहे.

मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लि.यांच्या Support Period साठी मूळ नस्तीतील कार्यादेशानूसार अट क्र. 5.2 अन्वये रू. 1,35,01,351/— इतका वार्षिक दर सबब दोन वर्षाच्या Support ची मुदतवाढ दिल्यास रू. 2,70,02,702/— इतक्या खर्चाची स्थायी समितीची मान्यता घेणेस्तव हा खर्च

कर व कर आकारणी विभागाच्या पद क्र. A29000622904(135) मधून सन 2018–2019 मध्ये 1,35,01,351 व सन 2019–2020 मध्ये 1,35,01,351 करणे प्रस्तावित आहे.

मंजूर अटी, शर्ती व दरावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव सादर.

वि.क्र. 782 :– {विद्युत विभाग} हनुमान नगर झोन क. 03, अंतर्गत प्रभाग क. 29 मधिल बेसा पावर हाऊस ते नरसाळा येथे जुने 9 मी. खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रू. 34,40,800/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– पद क. A22001374602 (जुने पद क. 629) अंतर्गत हा खर्च करावयाचा आहे.

वि.क्र. 783 :– {विद्युत विभाग} हनुमान नगर झोन क. 03, अंतर्गत प्रभाग क. 29 मधिल नरसाळा ते उमरेड रोड कडे जाणाऱ्या मार्गावर जुने 9 मी. खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रू. 25,92,950/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– पद क. A22001374602 (जुने पद क. 629) अंतर्गत हा खर्च करावयाचा असून चालू आर्थिक वर्षात प्रावधानाची रक्कम एकुण प्रावधानाच्या 70% पर्यंत सिमित ठेवण्याचे दृष्टीने या कामावरील खर्चाची रक्कम रू. 9 लक्ष पर्यंत सिमित ठेवण्यात येईल.

वि.क्र. 784 :– {विद्युत विभाग} धरमपेठ झोन क. 02 मधिल म.न.पा. च्या इंदिरा गांधी रूग्णालयात लिफ्टचा पुरवठा करणे, बसविणे व कार्यान्वयन करणे या कामाकरीता मे. कोने इलेव्हेटर इंडीया प्रा. लि., नागपूर यांची प्राकलनीय रकमेच्या तुलनेत 0.99% ने कमी असलेली रू. 51,32,492/– ची एकमेव निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– पद क. A43401171304 (जुने पद क. 603) अंतर्गत हा खर्च करावयाचे आहे.

वि.क्र. 785 :– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. ७–क अंतर्गत बाराखोली ते नागोबा मंदीर पर्यंत सी.सी. पेव्हमेंटचे बांधकाम करण्याच्या मोजमापातील फेरबदलासह सुधारीत प्राकलनीय रक्कम रू. ३२,६३,२१९/– च्या व निविदा किंमत रू. २८,८४,७४१/– च्या कामाकरीता प्राप्त दोन निविदांपैकी, मे. विजय प्रभाकर नायडु यांच्या निविदा किंमती पेक्षा ४.५० टक्के जास्त दराच्या रू. ३०,१४,५५४/– च्या निम्नत्तम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी. व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादीसह एकुण रू. ३४,१०,०६४/– च्या कार्य राशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.)

टिप :–

१) याकामाचा खर्च पद क्र. ६१४ (A42401370826) अंतर्गत प्रस्तावित असून या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

२) खर्च उपलब्ध प्रावधानापर्यंत सिमित राहील.

३) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 786 :– {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. १५ शंकरनगर येथे जीजाऊ स्मृती शोध संस्थान च्या बांधकामाच्या रु. १७,४१,९४,६५६/– च्या प्राकलनास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

१. कामाचा खर्च पद क्रमांक A42901371341 अंतर्गत करण्यात येईल.

२. या आर्थिक वर्षात उपलब्ध रु. २.०० कोटी प्रावधानपर्यंत खर्च सिमित ठेवण्यात येईल.

३. उर्वरित प्रावधान पुढील वर्षात उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. या कामाकरीता रितसर निविदा मागविण्यात येतील.

विषय क्रमांक 787:— विकास योजना — नागपूर

{नगर रचना विभाग} मौजे — गोरेवाडा, ता.जि. नागपूर येथील खसरा क्र. 32/1 आणि 32/2 ही जागा ग्रिन बेल्ट कंट्रोल स्किम तसेच ईपी —2 अंतर्गत कॅटन स्टेबल ॲड डेअरी फार्म (NW-129) या आरक्षणाने प्रस्तावित असल्याबाबत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 49 अन्वये खरेदी सुचनेच्या अनुषंगाने भुसंपादनाकरीता रू. 3,67,07,440/— ची आर्थिक तरतुद करण्याबाबत.

नागपूर शहराच्या मंजुर सुधारित विकास योजनेमध्ये मौजे — गोरेवाडा येथील आरक्षण क्र. — एन. डब्ल्यु—129 ''ईपी—2 अंतर्गत कॅटल स्टेबल ॲन्ड डेअरी फार्म या करिता आरक्षित आहे. सदर जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ''ग्रीन बेल्ट कंट्रोल स्कीम'' अंतर्गत समाविष्ट आहे. NW-129 या आरक्षणाकरिता समुचित प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका आहे. आरक्षण क्र. एन.डब्ल्यु.—129 (EP-2) नूसार उक्त आरक्षणामध्ये मौजा—गोरेवाडा येथील ख.नं. 5 ते 29, 2(पै), 49(पै) 30 (पै), 32 ते 35 या जमिनीचा समावेश आहे.

मौजा — गोरेवाडा, खसरा क्र. 32/1 (क्षेत्र 0.73 हेक्टर) 32/2 (क्षेत्र 0.81 हेक्टर) येथील जमिन मंजुर विकास योजना आराखडयामध्ये आ. क्र. NW-129 (कॅटल स्टेबल ॲण्ड डेरीफार्म) या आरक्षणामध्ये समाविष्ठ आहे. या आरक्षणाकरीता मे. देवीसन्स इस्टेट प्रा.लि. तर्फे संचालक श्री. ओमप्रकाश गोकुलदास बजाज यांनी दि. 14.05. 2018 रोजी शासनास कलम 49 अन्वये खरेदी सुचना बजावलेली होती. सदर खरेदी सुचना शासनाने क्र. टिपीएस—2418 / 783 /प्र.क्र.146/2018/नवि—9, दि. 10 जुलै 2018 च्या पत्रान्वये कायम केलेली आहे. त्यामुळे सदर आरक्षणाखालील जागेचे भुसंपादन करण्याकरीता परीगणीत केलेली राशी उपलब्ध होणे आवश्यक आहे. या आरक्षणाखालील जागेच्या भुसंपादनाकरीता अंदाजीत रू. 3,67,07,440/—याप्रमाणे मोबदला परीगणीत करण्यात आलेला आहे. (उक्त परिगणीत करण्यात आलेला मोबदला अंदाजित असून मोबदल्याची निश्चित रक्कम ही भुसंपादन अधिकारी यांनी ठरविल्याप्रमाणे अंतिम असेल).

मौजे — गोरेवाडा, ता.जि. नागपूर येथील खसरा क्र. 32/1 (क्षेत्र 0.73 हेक्टर) आणि 32/2 (क्षेत्र 0.81 हेक्टर) मधील ईपी —2 अंतर्गत कॅटल स्टेबल ॲड डेअरी फार्म (NW-129) या आरक्षणापैकी जागेच्या भुसंपादनाकरीता आवश्यक असलेला निधी रू. 3,67,07,440/— उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

वि.क्र. 788 :— नागपूर महानगरपालिकेतर्फे ज्या ठिकांणावर मिटर निहाय

{विद्युत विभाग} विजेचा वापर १ किलो वॅट किंवा १ किलो वॅट पेक्षा जास्त आहे त्या प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे सौर उर्जा संयंत्र बसविण्यास व पाणीपुरवठा केंद्रांमधे मोठया प्रमाणात विजेच्या वापराचा विचार करता नेट मिटरींग व नेट मिटरींग शिवाय (ओपन ॲक्सेस) सौर उर्जा निर्मीती संयंत्र बसविण्याचा प्रकल्प राबविण्यास व या प्रकल्पाकरीता येणारा खर्च उर्जा निर्मीतीतून होणा–या बचतीतून वळता करण्याचे दृष्टीने "सौर उर्जा निर्मीती संयंत्राचा पुरवठा करणे, बसविणे, कार्यान्वयन करणे व या सौर उर्जा संयंत्रांकरीता येणा–या खर्चाची डेफर्ड बेसीसवर (ई.एम.आय.रुपाने) २४० महिने परतफेड करणे व या संपूर्ण कालावधीमधे या संयंत्राची देखभाल दुरुस्ती करणे" या कामाकरीता झोननिहाय दर मागविण्याचे दृष्टीने तिस–या वेळेस निविदा बोलाविल्या असता प्राप्त झालेले खालील सुधारीत निम्नतम दर सुधारीत अटी - शर्तीच्या अधिन राहुन मंजूर करण्याचा :

अ) इमारतीच्या छतांवर बसवावयाचे सौर उर्जा संयंत्र (नेट मिटरींग व्दारा) ई.एम.आय/प्रती कि.वॅट (२० वर्षे परतफेड करण्यास्तव)

१) १ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२९०/-
२) २ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२७५/-
३) ३ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२६५/-
४) ४ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२५५/-
५) ५ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२४५/-
६) ६ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२३५/-
७) ८ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२१५/-
८) १० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२२०/-
९) १२ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२०६/-
१०) १५ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १२००/-
११) २०कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११६०/-
१२) ३०कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११७०/-
१३) ७० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११७५/-
१४) ७९ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११५०/-
१५) ८६ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११२५/-
१६) २०० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ११००/-
१७) ५०० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १०८०/-
१८) ७९० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १०५०/-

ब) पथ दिव्यांकरीता रस्त्यांवर किंवा महानगरपालिकेच्या योग्य ठिकाणी सौर उर्जा संयंत्र (नेट मिटरींग व्दारा) ई.एम.आय/प्रती कि.वॅट (२० वर्षे परतफेड करण्यास्तव)

१) ६ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १३३५/-
२) ८ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १३२३/-
३) १० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १३१७/-
४) १२ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १३११/-
५) १५ कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये १३००/-

क) पाणीपुरवठा केंद्र – मलनिःसारण केंद्र या ठिकाणी बसवावयाचे सौर उर्जा संयंत्र (कॅप्टीव्ह ओपन ॲक्सेस व्दारा) ई.एम.आय/प्रती कि.वॅट (२० वर्षे परतफेड करण्यास्तव)

ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर

१) २००० कि.वॅट क्षमतेचे ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर – रुपये ८८०/-
२) २५०० कि.वॅट क्षमतेचे ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर – रुपये ८८०/-
३) ३००० कि.वॅट क्षमतेचे ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर – रुपये ८८०/-
४) ३५०० कि.वॅट क्षमतेचे ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर – रुपये ८८०/-
५) ४००० कि.वॅट क्षमतेचे ग्राऊंड माऊंटेड स्ट्रक्चर – रुपये ८८०/-

इलेव्हेटेड स्ट्रक्चर

१) २००० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ९८०/-
२) २५०० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ९८०/-
३) ३००० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ९८०/-
४) ३५०० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ९८०/-
५) ४००० कि.वॅट क्षमतेचे इलेव्हेटेड स्ट्रक्चर – रुपये ९८०/-

बुस्टर पंप

(नेट मिटरींग व्दारा) ई.एम.आय/प्रती कि.वॅट (२० वर्षे परतफेड करण्यास्तव)

१) १९ कि.वॅट क्षमतेचे नॉन इलेव्हेटेड स्ट्रक्चर - रुपये १२००/-
२) २५ कि.वॅट क्षमतेचे नॉन इलेव्हेटेड स्ट्रक्चर - रुपये ११८०/-
३) २६ कि.वॅट क्षमतेचे नॉन इलेव्हेटेड स्ट्रक्चर - रुपये ११८०/-
४) ३७ कि.वॅट क्षमतेचे नॉन इलेव्हेटेड स्ट्रक्चर - रुपये ११००/-

ईलेक्ट्रो क्लोरीनेटर

(नेट मिटरींग व्दारा) ई.एम.आय/प्रती कि.वॅट (२० वर्षे परतफेड करण्यास्तव)
१) ४ कि.वॅट क्षमतेचे - रुपये १२००/-
२) ८ कि.वॅट क्षमतेचे - रुपये १२००/-
३) १२ कि.वॅट क्षमतेचे - रुपये १२००/-
४) ३६ कि.वॅट क्षमतेचे - रुपये ११५०/-

व या सुधारीत निम्नतम दरांवर सुधारीत अटी - शर्तींच्या अधिन राहुन झोन क्र. १, ३, ५ व ६ चे काम मे. शांती जी.डी. इस्पात ॲंड पॉवर प्रा.लि. , रायपूर यांना , झोन क्र. २, ४, व ८ चे काम मे. रोहीत स्टील, नागपूर यांना व झोन क्र. ७, ९ व १० चे काम मे. ब्राईल सोलर एनर्जी प्रा. लि., चेन्नई यांना देण्यास व या सुधारीत निम्नतम दरानुसार या कामाकरीता २० वर्षांकरीता ई.एम. आय. रुपाने परतफेड करण्याच्या रु. ९,४५,३४,७७,६००/- (मुळ निविदा दरानुसार ही किंमत रु. १०,३३,७६,०१,६००/-) खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप : सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 789 :— {जलप्रदाय विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा प्रणालीचे उन्नतीकरण व बळकटीकरण करणे व लोकसहभागाद्वारे (PPP तत्वावर) दिर्घ कालावधीकरीता 24x7 पाणीपुरवठा व्यवस्थापनाच्या प्रकल्पिय कामाच्या मंजूर करारासंदर्भात नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची पाणी कंपनी NESL च्या विश्वस्थांच्या दि. 15.02. 2019 रोजीच्या बैठकीत ऑपरेटर मे. ओ.सी.डब्ल्यु.पी.एल. सोबत one time settlement अंतर्गत चर्चा करून पारीत केलेल्या ठरावाबाबत यथायोग्य निर्णय घेवून म.न.पा.च्या सभेपूढे मंजूरीस्तव सादर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— 1. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 790 :— {वित्त विभाग} नागपूर महानगरपालिकेला बॅंक ऑफ महाराष्ट्र कडून मंजूर रु. 200 कोटी नविन कर्जाचे (Fresh Term Loan ) प्रस्तावास स्थायी समिती व्दारे मंजूरी प्रदान करून महासभेच्या अंतिम मंजूरी करीता सादर करण्याचा प्रस्ताव विचारात घेणे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सहा. महाप्रबंधक, बॅंक ऑफ महाराष्ट्र, प्रादेशिक कार्यालय, सिताबर्डी, नागपूर यांचे दिनांक 20/12/2018 चे पत्रानुसार बॅंक ऑफ महाराष्ट्रने रू 200 कोटी नविन कर्ज (Fresh Term Loan ) 9.75 P.A. ( Fixed ) व्याज दरावर खालील नमूद अटी व शर्तीवर मंजूर करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

अ) सुविधा— 1 ( Term Loan IV )

| | | |
|---|---|---|
| 1)<br>2) | सिमेंट रस्ते प्रकल्प ( फेज –II व फेज–III )<br>सुरक्षा ठेव– मनपाला प्राप्त होणारे सर्व प्रकारच्या करापासून उत्पन्नामध्ये हायपोथिकेशन करणे | रू 128 कोटी |
| 3) | मार्जिन | 36.29% |
| 4) | व्याजाचा दर | 9.75 P.A. (Fixed ) |
| 5) | Reset of Interest Rate | Annually |
| 6) | मोरेटेरियम कालावधी | 12 महिने<br>(कर्जाचा प्रथम हप्ता उचल केल्याचा दिनांकापासून ) |
| 7) | कर्ज उचल मर्यादा | 31.03.2020 |
| 8) | कर्ज परतफेड कालावधी | 72 महिने<br>(मोरेटेरियम कालावधी वगळून ) |

| | | |
|---|---|---|
| 9) | कर्ज परतफेडीबाबतचा हप्ता | 71 समान हप्ते रू 1.80 कोटी दरमहा शेवटचा हप्ता रू 0.20 कोटी |
| 10) | प्रोसेसींग फि व इतर शुल्क | निरंक |
| 11) | विशिष्ट अट | Undertaking from NMC for debiting their account on due date for recovery of interest and instalment to be obtained and with standing Instructions. |

ब) सुविधा– 2 ( Term Loan V )

| | | |
|---|---|---|
| 1) | कर्ज मर्यादा अमृत योजने अंतर्गत विकास कामे घेण्याकरीता | 72 कोटी |
| 2) | इतर शर्ती व अटी | वरील सुविधा क्रमांक 1 प्रमाणे लागू राहतील |
| 3) | कर्ज प्रतफेडीचा हप्ता | 72 समान हप्ते प्रत्येकी दरमहा 1.00 कोटी |

उपरोक्त 'अ' व 'ब' व्यतिरिक्त सदर कर्जाच्या रकमेमधून प्राधान्यानुसार बुधवार बाजार व सक्करदरा मार्केट विकास कामासाठी रू 25 कोटी व रू 25 कोटी मेट्रो मॉल/ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पासाठीं निधी उपयोगात आणण्यासाठी चा समावेश करण्यास मंजूरी प्रदान करणे त्यामुळे वरील अ व ब च्या कर्ज रकमेपैकी प्रत्येकी रू 25 कोटी कमी करून एकूण रू 50 कोटी या कामासाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे.

हया व्यतिरिक्त बॅक ऑफ महाराष्ट्र ने सदर कर्जाकरीता इतर सामान्य 25 अटी व शर्ती तसेच कर्ज मंजूरीच्या प्रस्तावात नमूद केलेल्या आहेत व इतर अटी खालील प्रमाणे आहे.

1) सदर कर्जाची रक्कम ज्या प्रकल्पाकरीता मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रकल्पासाठी खर्च करावयाची आहे.

2) हया कर्ज परतफेडीसाठी महानगरपालिका व बँकेसोबत एस्क्रो ॲग्रीमेंट सुध्दा करावयाचे आहे.

3) हया कर्जासाठी महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचे मॉरगेज ठेवायचे नसून हयासाठी शासन हमीची सुध्दा आवश्यकता नाही

4) सदर नविन कर्ज मंजूरीसाठी मनपा व बॅक ऑफ महाराष्ट्र मध्ये करावयाचा करारनामावर इतर तत्सम कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी मनपाचे प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांना प्राधिकृत करण्यास व मनपाला बॅंक ऑफ महाराष्ट्र कडून उपरोक्त नमूद रू 200 कोटी चे कर्ज व हया कर्जाचा व्याज दर निश्चीत करण्यासाठी स्थायी समितीने ठराव मंजूर करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी सादर करण्यात येते की नागपूर मनपाचे स्थायी समितीने ठराव क्रमांक 07 दिनांक 9/3/2018 प्रमाणे व मनपा महासभा ठराव क्रमांक 205 दिनांक 27/3/2018 नुसार मनपाकडील पूर्वीच्या कर्जाचे (जेएनएनयुआरएम अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना पेंच 4 पार्ट 1 करीता घेतलेल्या कर्जाचे ) पुर्नःएकीकरण (Top Up) करण्याचे प्रस्तावास मंजूरी दिली आहे मात्र शासनाने नागपूर महानगरपालिकेला महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – नामपा 2018/ प्र.क्र. 73/नवि 26 दिनांक 4 ऑगष्ट 2018 नुसार मोठया भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पाकरीता आवश्यक निधी व विविध प्रकल्पासाठी मनपा हिस्सा उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने रू 200 कोटीचे नविन कर्ज घेण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच सदर कर्जाच्या अटी व शर्ती संबंधित वित्तीय संस्था व नागपूर मनपा यांनी परस्पर संमतीने मान्य करावयाच्या आहेत.

सदर कर्जाचे व्याजदर कमी करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक 787/प्रलेविअ/2018 दिनांक 31/12/2018 नुसार बॅक ऑफ महाराष्ट्र ने मंजूर केलेला व्याजदर 9.75 हा कमी करण्यासाठी विनंती करण्यात आली होती. मात्र.क्षेत्रिय प्रबंधक बॅक ऑफ महाराष्ट्र, प्रादेशिक कार्यालय, सिताबर्डी, यांनी त्यांचे पत्र क्रमांक AX7/NZ/ADV/2018-19-4729 Date 03.01.2019 नुसार व्याजदर 9.75% स्विकारण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे बॅक ऑफ महाराष्ट्रने सदर कर्जाकरीता व्याजदर कमी केलेला नाही.

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर महानगरपालिकेला बॅक ऑफ महाराष्ट्रने मंजूर केलेले रू 200 कोटीचे कर्जाकरीता खालील प्रमाणे स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

1) बॅक ऑफ महाराष्ट्र चे प्रस्तावानुसार सदर कर्ज मंजूरी साठी व  मनपाचे आर्थिक हिताचे दृष्टीने व व्याज दराबाबत भविष्यात लेखा आक्षेप येवू नये म्हणून सदर कर्जाचा व्याज दर निश्चीत करण्याची बाब ही आर्थिक बाबींशी निगडीत असल्याने यास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करणे.
2) बॅक ऑफ महाराष्ट्र ने रू 200 कोटी कर्ज मंजूर करतांना नमूद केलेला व्याजदर 9.75 P.A. (Fixed) हयाबाबत बॅकेला मनपाचे आर्थिक हिताचे दृष्टीने बॅक ऑफ महाराष्ट्रशी वाटाघाटी करण्याबाबत निर्णय घेणे.
3) बॅक ऑफ महाराष्ट्र ने त्यांचे प्रस्तावात नमूद केलेले व्याजदराची Annual Reset च्या अटीबाबत निर्णय घेणे.

करीता वर नमूद प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरी नंतर अंतिम मंजूरी करीता मनपा महासभेसमोर सादर करण्याचे मंजूरीस्तव सादर
टिपः– सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 791 :–
{कार्य.अभि.झोन क्र. 4}

प्रभाग क्र. ३५  ब जयप्रभु सोसायटी, अमर संजय सोसायटी, जयदुर्गा सोसायटी, साईकृपा सोसायटी आणि विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे. रू.४४२३६७८/- च्या निविदा राशीचे म.न.पा. निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे. **S.K. Mehta AndCo.** यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रूपये ३९८१३५५/- ची निविदा प्राप्त झाली. या कामाची प्रशायकीय मान्यता रक्कम रु. ४९९९९९०/- असुन या कामावर निविदाकाराच्या प्राकलनीय राशीच्या १०.०० टक्के कमी दराचा देकार रूपये ३९८१३५५/- + १२ टक्के जीएसटी रूपये ४७७७६३/- व टेस्टींग चार्जेस रूपये ३९८१४/- असे एकूण रूपये ४४९८९३२/- ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.
टीप :-
१) सदर काम ''महानगरपालिका क्षेत्रात'' म.न.पा. नागपूर मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी प्रस्तावित आहे.
२) सदर काम म.न.पा.आय व्यय पद क्र. A४२००१३७४६१२(६८०) मधून प्रस्तावित आहे.
४) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र. 792 :–
{स्लम विभाग}

प्रभाग क्र. 29 (पार्ट नं. 1) हुडकेश्वर बुद्रुक गेट ते स्मशान घाट पर्यन्त सिमेंट कॉक्रीट रोड तयार करणे आणि (पार्ट नं. 2) हुडकेश्वर बुद्रुक जिल्हापरिषद शाळे जवळील नाल्यावर बॉक्स सेल ब्रिज बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. विश्वदिप एंटरप्राईजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.31% टक्के कमीवर असलेली रूपये 95,80,785/– (रूपये पंच्यान्नव लक्ष, अंशी हजार सातशे पंच्यांशी फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.
टिप :
1. या कामास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचे दि. 04.05.2018 चे पत्रान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या कामाचा संपूर्ण खर्च शासकीय निधीतुन करण्यात येईल.
2. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 793 :–
{लोककर्म झोन 10}

प्रभाग क्र. 1 ड अंतर्गत शिव मंदीर ते कुकरेजा नगर येथील रोडचे सिमेंट कॉंक्रीटकरण करुन रोडचे बांधकामाबाबतच्या कामाची प्राकलनीय रक्कम रु. 49,88,544/– असलेल्या निविदा किंमत रु. 44,41,915/– च्या कामाकरिता प्राप्त तीन निविदापैकी मे. महेश कंन्स्ट्रक्शन यांची निविदा किंमतीपेक्षा 7 टक्के कमी दराच्या रु. 41,30,981/– च्या प्रथम निम्नतम निविदेश तथा त्यावरील 12 टक्के जीएसटी रु. 4,95,718/–

अधिक गुणवत्ता चाचणी रु. 14,700/– सह एकूण रु. 46,41,399/– च्या कार्यराशीस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

1. मा. स्थायी समिती ठराव क्र. 454 दि. 21.12.2018 अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे.
2. या कामाचा खर्च पद क्र. ए42001470511 अंतर्गत प्रस्तावित आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न.

वि.क्र. 794 :– {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. 1 ब मधील नारा गांव थेथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे व फुटपाथचे बांधकाम करण्याचे कामास्तव रू. 52,98,725 रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A४२००१३७४६०२ अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे

टिप:—

१) मा. सभापती स्थायी समिती यांनी पत्र क्र. १३१५/TR/CSC/ Provision दि. २१.१२.२०१८ नुसार या कामास रू. ५२,९८,७२५/— रक्कमेचा प्रावधान पद क्र. A४२००१३७४६०२ मधून उपलब्ध करून दिलेले आहे.

२) या कामास्तव रू. ४७,३३,८९२/— रक्कमेच्या प्राकलनास मा. अधिक्षक अभियंता यांनी Vide/ T.S. No. /SE/PWD/T.S./277/2018-2019 दि. २४.०१.२०१९ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

३) सविस्तर टिप्पणी नस्तीत सलग्न आहे.

वि.क्र. 795 :– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २३ (क) अंतर्गत लकडगंज येथे जिवनधारा अपार्टमेंट ते भक्तीसागर अपार्टमेंट पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे या कामाकरीता प्राप्त निविदाकार मे. संतोष खरपकर यांची ७.११ टक्के कमी दराची रु. ६४,५७,७६६/— + १२% GST (७७४९३२/—) + Testing Charges रु. ६२२५०/— + Utility Charges रु. ३,५०,७१५/— असे एकूण ७६,४५,६६३/— राशीच्या निम्नतम निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. या कामाचा खर्च पद क्र. A४२००१४७०५११मधून प्रस्तावित आहे.

टिप :—

१. प्रस्तूत कामास स्थायी समिती ठराव क्र. ५२८ दि. ०२/०१/२०१९ नुसार प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.

२. सदर कामाचा खर्च पद क्र. A४२००१४७०५११ मधुन करण्यात येईल

३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

——————